शिक्षण मंडळ कार्यालय,पुणे महानगरपालिका,
कै.भाउसाहेब शिरोळे भवन, जुना तोफखाना,
शिवाजीनगर, पुणे — ४११ ००५.
जा.क्र./खाप्राशा/३०७० /२००२—२००३,
पुणे, दिनांक :— १.१०.२००२.

अध्यक्ष,
सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटी,
४४/१, वडगाव बु ।।,
पुणे ४१.

विषय :— सन २००२—२००३ या शैक्षणिक वर्षात नवीन खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत.

संदर्भ :— शालेय शिक्षण विभागाकडील शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. पीएलएस/१००२/(४२२/२००२)/ प्राशि—३ दि. २०.५.२००२.

मा. शिक्षण मंडळ ठराव क्र. १०५ दि. २५.९.२००२ नुसार सिंहगड सिटी स्कूल, कोंढवा बुद्रुक, ता. हवेली, जि. पुणे या शाळेस सन २००२—२००३ या शैक्षणिक वर्षात भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर इ. १ ली च्या फक्त एका तुकडीस इंग्रजी माध्यमाच्या वर्गास कायम विनाअनुदान तत्वावर शाळा सुरु करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग यांचे पत्र जा.क्र. प्राशि/खाप्राशा/मान्यता/पुवि/४०१३७/४१/२००२ दि. ४ सप्टेंबर २००२ चे पत्रातील अटीचे पालन संस्थेने करणे आवश्यक आहे, याची नोंद घ्यावी.

दि. १.१०.२००२.

शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ,पुणे महानगरपालिका

प्रत :—
मा. शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,
पुणे.

पुणे जिल्हा परिषद, पुणे
''शिक्षण विभाग (प्राथमिक)
यशवंतराव चव्हाण भवन ''
जा. क्र. जिप/शिक्षण /प्राथ/२/२१/५३७/२००३
पुणे. दिनांक :- ११/८/२००३

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,

सिंहगड सिटी स्कूल
कोंढवा बु" ता. हवेली
जि- पुणे

विषय :- इंग्रजी माध्यमाच्या ''कायम विनाअनुदान तत्वावरील '' शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना जादा / नैसर्गिक वाढीचा / वाढीच्या प्रथम/ जादा तुकडया / वर्ग उघडण्यास परवानगी देणे बाबत. (माध्यम-इंग्रजी)

संदर्भ :- शासन निर्णय क्रमांक व्हीएलएस-१००२/(१०००/०२/)/प्राशि-३
दिनांक :- १४ जानेवारी २००३

वरील विषयासंबंधीचा आपणांकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद केलेल्या शाळेस त्यांचे नावासमोर दर्शविण्यात आलेल्या जादा / नैसर्गिक वाढीचा / वाढीच्या प्रथम / जादा तुकडया / वर्ग जून - २००२ पासून सन २००२-२००३ या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजूर करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | तुकडी वाढ जादा / नैसर्गिक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | सिंहगड सिटी स्कुल, कोंढवा बु// ता. हवेली , जि. पुणे. | इंग्रजी | इ. २ री ते इ. ७ वी | नैसर्गिक प्रत्येकी एक | मंजूर / ~~नामंजूर~~ |

अटी व शर्ती

१. शाळेस शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायीक अर्हतेचा व आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहीजे.
२. सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतिक सुविधा तसेच शैक्षणिक व व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन नेमला पाहीजे.
३. सदर शाळेस स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
४. शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहीजे.
५. सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेतील पटावर विपरीत परिणाम होणार नाही. याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६. सदर शाळेच्या वर्गास / तुकडीस विदयार्थी संख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.
७. तपासणी अंती एक जरी अट नियमबाहय निदर्शनास आल्यास तुकडी / वर्ग मान्यता रदद करणेत येईल.
८. पट व उपस्थिती वाढविण्याचे अटीवर सदर मान्यता देण्यात येत आहे.

शिक्षणधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, पुणे-१.

प्रत :- माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.
१. सचिव / ~~अध्यक्ष~~
~~सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटी पुणे-४१~~
२.) मा. शिक्षण प्रमुख.
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका पुणे-५

परवानगी वर्ष : २००२ - २००३
माध्यम : ~~मराठी/उर्दू/इंग्रजी~~
~~विना/अनुदानित~~/कायम विनाअनुदान

जा.क्र. माध्य.३(१४)/प्रथम मान्यता/पुवि/२००१ ३३०९९/२०
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे - १ यांचे कार्यालय.
दिनांक : 26 JUL 2002

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद,

विषय : प्रथम मान्यता. सिंहगड सिटी सेकंडरी स्कूल, कोंढवा बु" ता. हवेली

संदर्भ : १. आपले पत्र क्रमांक शिक्षण/ माध्य/ह-४/प्र. मा/०२-०३, दि. २०. ७. २००२
२. शा.प.क्र. नमाशा-२००२/[१९६/२००२]माशि-१, दि. ६. ४. २००२
३. माध्य-३/१४/ नमाशा/ पुवि/ २००२, दि. १७. ४. २००२

वरील संदर्भिय पत्रान्वये कळविण्यांत येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१, ३.२ व ३.३ अन्वये सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटी, वडगांव बु" सर्व्हे नं. ४४/१, पुणे-४११०४१ संस्थेच्या सिंहगड सिटी सेकंडरी स्कूल, कोंढवा बु" ता. हवेली माध्यमिक शाळेच्या **इयत्ता आठवी** च्या वर्गास २००२ - २००३ या शैक्षणिक वर्षासाठी जून २००२ पासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटींची पूर्तता अधिन राहून देण्यांत येत आहे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी खालील अटींची पूर्तता शाळा करित आहे किंवा कसे याची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटी पूर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटी पुर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याबाबतही अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यांत यावा.

१. संस्थेने स्वतःच्या मालकीची शैक्षणिकदृष्ट्या योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन घ्यावी.
२. मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करावी.
३. स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा सर्व साहित्यानिशी उपलब्ध करुन घ्यावी.
४. स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन दरवर्षी अधिक ग्रंथांची भर घालावी.
५. विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन घ्यावे.
६. पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करुन घ्यावा.
७. स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करुन घ्यावी.
८. वाढीव फी चे दर मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचेकडून मंजूर करुन घ्यावेत.
९. शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून त्यात अद्ययावत नोंदी घेण्यात याव्यात.
१०. कर्मचा-यांना सरकारी वेतनश्रेणी नुसार वेतन अदा करावे.
११. शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
१२. विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करावी.
१३. तपासणी अहवालातील सूचनांची पूर्तता करावी.
१४. पालक शिक्षक संघाची स्थापना करावी.
१५. विद्यार्थ्यांसाठी संगणक सुविधा उपलब्ध करावी.
१६. विद्यार्थी संख्या वाढवावी.
१७. ~~सोबतच्या अटींची पूर्तता ... देण्यात येत आहे.~~

स्थळप्रतीवर शि. उ. सं. यांची
सही असे,

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१

त :

सिंहगड सिटी ...

पुणे जिल्हा परिषद, पुणे.
"यशवंतराव चव्हाण भवन"
शिक्षण [माध्यमिक] विभाग.
जा.क्र.शिक्षण/माध्य/ह-४/
नै.वाढ/०३-०४
पुणे. दिनांक : 22/7/२००३

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
सिंहगड सिटी स्कूल, कोंढवा बु।।
ता. हवेली, जि. पुणे.

विषय : नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत. २००३-०४
इ.६ वी, इ.७ वी, इ.९ वी, इ.१० वी.

आपल्या सिंहगड टेक्निकल एज्यु. सोसायटी, वडगाव बु।। पुणे या शैक्षणिक संस्थेव्दारा संचलित सिंहगड सिटी स्कूल, कोंढवा बु।। ता. हवेली माध्यमिक विद्यालयास इ.८ वी/इ.५ वी.चा वर्ग सुरु करणेस सन २००२-०३ या शैक्षणिक वर्षापासून मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडील आदेश क्र.माध्य/३[१४]/नमाशा/मान्यता/पुवि/96023/24, दि. 9/7/2002 अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. सन २००३-२००४ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत इ.६ वी, इ.७ वी, इ.९ वी, इ.१० वी चा वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे. सदर वर्गास जून २००३ पासून नैसर्गिक वाढीने परवानगी देणेत येत आहे. तरी आपण सदर वर्गाची वार्षिक तपासणी करुन घेणेसाठी संबंधित उपशिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, पुणे/गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, हवेली यांचेशी संपर्क साधावा. तसेच शाळेची वेळेत तपासणी करुन घेवून तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयाकडे सादर करणेत यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये नैसर्गिक वाढीने इ.१० वी. चा वर्ग सुरु होत आहे, अशा सर्व माध्यमिक शाळांनी मा. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे १० यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा.

त्याप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता वेळेत करावी अन्यथा शाळेस संकेतांक न मिळाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही, याची नोंद घेणेत यावी.

J.N.Ha...

शिक्षणाधिकारी[माध्यमिक]
जिल्हा परिषद, पुणेकरिता.

पुणे जिल्हा परिषद, पुणे.
"यशवंतराव चव्हाण भवन"
शिक्षण [माध्यमिक] विभाग.
जा.क्र.शिक्षण/माध्य/ह-४/
नै.वाढ/०३-०४
पुणे. दिनांक : २८/४/२००३

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
सिंहगड सिटी स्कूल
कोंढवा, ता. हवेली जि. पुणे

विषय : नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत. २००४-०५
===== ~~इ.६ वी~~, ~~इ.७ वी~~, ~~इ.९ वी~~, इ.१० वी.
==========================================

आपल्या अध्यक्ष सिंहगड टेक्निकल एज्यु. सोसा. पुणे-४१ या शैक्षणिक संस्थेव्दारा संचालित सिंहगड सिटी स्कूल, कोंढवा (बु.) ता. हवेली, पुणे माध्यमिक विद्यालयास इ.८ वी/~~इ.५ वी~~.चा वर्ग सुरु करणेस सन २००२-०३ या शैक्षणिक वर्षापासून मा.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडील आदेश क्र.माध्य/३[१४]/नमाशा/मान्यता/पुवि/१६०२३/२५, दि. १६/७/०२ अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. सन २००४-२००५ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत ~~इ.६ वी~~, ~~इ.७ वी~~, ~~इ.९ वी~~, इ.१० वी चा वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे. सदर वर्गास जून २००४ पासून नैसर्गिक वाढीने परवानगी देणेत येत आहे. तरी आपण सदर वर्गाची वार्षिक तपासणी करुन घेणेसाठी संबंधित ~~उपशिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, पुणे~~/गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती हवेली यांचेशी संपर्क साधावा. तसेच शाळेची वेळेत तपासणी करुन घेवून तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयाकडे सादर करणेत यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये नैसर्गिक वाढीने इ.१० वी. चा वर्ग सुरु होत आहे, अशा सर्व माध्यमिक शाळांनी मा.विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे १० यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा.

.त्याप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता वेळेत करावी अन्यथा शाळेस सांकेतांक न मिळाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही, याची नोंद घेणेत यावी.

(सही)
२८/४

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, पुणे करिता.